| | | सुनावणीचा दि.04.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 54/2020 | श्री. सोमनाथ येडु मनाळ, रा. जिवाजी महाले चौक योगेश्वरी शाळेजवळ, गट नं. 86, प्लॉट नं. 65 वडगाव कोल्हाटी ता. जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) परिक्षेत्र वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), उपवनसंरक्षक कार्यालय उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | |
| 2 | 55/2022 | श्री. सोमनाथ येडु मनाळ, रा. जिवाजी महाले चौक योगेश्वरी शाळेजवळ, गट नं. 86, प्लॉट नं. 65 वडगाव कोल्हाटी ता. जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) परिक्षेत्र वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), उपवनसंरक्षक कार्यालय उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | |
| 3 | 59/2022 | श्री. सोमनाथ येडु मनाळ, रा. जिवाजी महाले चौक योगेश्वरी शाळेजवळ, गट नं. 86, प्लॉट नं. 65 वडगाव कोल्हाटी ता. जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) परिक्षेत्र वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), उपवनसंरक्षक कार्यालय उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | |
| 4 | 62/2022 | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, रा. ए-51, नाथनगर सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) परिक्षेत्र खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), उपवनसंरक्षक कार्यालय उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | |
| 5 | 899/2022 | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, रा. ए-51, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर-431105 | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), वन विभाग सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक (प्रा), उपवनसंरक्षक कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 6 | 174/2022 | श्री. शेख हुसेन बुन्हान शेख, मु.पो. पळशी (शहर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी, मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर | विभागीय वन अधिकारी (नियोजन), छत्रपती संभाजीनगर वनसंरक्षक (प्रा), छत्रपती संभाजीनगर | |
| 7 | 224/2022 | श्री. सत्संगराज भिवराज सोनवणे, रा. नुर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिससमोर, नारळीबाग छत्रपती संभाजीनगर | कार्यालय अधिक्षक, उपवनसंरक्षक (प्रा), छत्रपती संभाजीनगर वनविभाग छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक (प्रा), छत्रपती संभाजीनगर वनविभाग छत्रपती संभाजीनगर | |
| 8 | 894/2022 | श्री. राजेंद्र बाबुराव राऊत, व्दारा सी 9/5, भारत नगर एन-13 हडको छत्रपती संभाजीनगर | कार्यालय अधिक्षक, छत्रपती संभाजीनगर वनविभाग "वनभवन" एस.एस.सी. बोर्डा समोर, रेल्वे स्टेशन रोड उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, वन विभाग छत्रपती संभाजीनगर "वनभवन" एस.एस.सी. बोर्डा समोर, रेल्वे स्टेशन रोड उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | |
| 9 | 1804/2022 | श्री. साहेबराव श्रीरंग हजारे, रा. प्लॉट नं. 12, संगिता कॉलनी बास्केट बॉल ग्राउंडच्या शेजारी भावसिंगपुरा रोड छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. उपवनसंरक्षक (प्रा) वनीकरण छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक (प्रा) वनीकरण छत्रपती संभाजीनगर | |
| 10 | 1987/2022 | श्री. अंबादास राजाराम तळवणकर, रा. एन-11, सी-4, गजाननगर, हडको, छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) परिक्षेत्र वन भवन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर | सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण), सहायक वनसंरक्षक कार्यालय, वनभवान उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.04.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 2159/ 2022 | श्री. शिंदे महेंद्र सुखदेव, रा. जयभीमनगर, टाऊन हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) परिक्षेत्र खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर | उपवनसंरक्षक (प्रा), उपवनसंरक्षक कार्यालय उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | |
| 12 | 2161/ 2022 | ॲड. रमेशचंद उ जाजु, रा. आर एच-20, ऑरेंज सिटी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) परिक्षेत्र वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा), सहाय्यक वनसंरक्षक कार्यालय नगर परिषद ईमारतीच्या शेजारी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 13 | 2162/ 2022 | ॲड. रमेशचंद उ जाजु, रा. आर एच-20, ऑरेंज सिटी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा) परिक्षेत्र वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा), सहाय्यक वनसंरक्षक कार्यालय नगर परिषद ईमारतीच्या शेजारी कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 14 | 2271/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | वनक्षेत्रपाल, समाजिक वनिकरण परिक्षेत्र सिल्लोड ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | |
| 15 | 2272/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | वनक्षेत्रपाल, समाजिक वनिकरण परिक्षेत्र ग्रामीण छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | |
| 16 | 2273/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | वनक्षेत्रपाल, समाजिक वनिकरण परिक्षेत्र वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | |
| 17 | 2274/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | वनक्षेत्रपाल, समाजिक वनिकरण परिक्षेत्र कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | |
| 18 | 2275/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | वनक्षेत्रपाल, समाजिक वनिकरण परिक्षेत्र खुलताबाद ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | |
| 19 | 2276/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी, वन विभाग कार्यालय खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक (वनीकरण), वन विभाग कार्यालय उपवनसंरक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर | |
| 20 | 2277/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.04.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 2278/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | |
| 22 | 2279/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारात 1 ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर | |
| 23 | 2280/ 2022 | श्री. शेख मिनहाज हाजी कादर, मु.पो. चांदा ता. नेवास जि. अहमदनगर | वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय वन विभाग रेल्वेस्टेशन रोड उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर | सहा. वनसंरक्षक (वनीकरण), उप वन संरक्षक कार्यालय वन भवान तळ मजला छत्रपती संभाजीनगर | |
| 24 | 3009/ 2022 | श्री. गोरख वामन पवार, रा. सिडको एन-2, प्लॉट क्रं. 29, सर्वे नं. 12, श्रध्दा कॉलनीच्या बाजुला धुत हॉस्पीटल जवळ, तोरणागडनगर, छत्रपती संभाजीनगर | वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा), परिक्षेत्र कार्यालय उस्मानपुरा रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर | सहायक वनसंरक्षक (प्रा), कार्यालय उस्मानपुरा रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर | |
| 25 | 1468/ 2022 | श्री. विश्वास देविदास नवपुते, रा. चिकलठाणा सुतारवाडा ता. जि. छत्रपती संभाजीनगर | मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | उप अधिक्षक भुमि अभिलेख गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 26 | 2350/ 2022 | श्री. शेख मोईजोदिन अमीरोदिन, रा. गुलशन कॉलनी, एम.जी.एम. गोल्फ क्लब गेट समोर शीफा मेडिकल शेजारी छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | ज.अ.अ. उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 27 | 2862/ 2022 | श्री. शोयब शामशोदिन शेख, रा. शम्स विला, प्लॉट क्रं. 97, सेक्टर ए-13, सिडको, हिमायतबाग, छत्रपती संभाजीनगर-431002 | ज.मा.अ.उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.अ.अ.उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 28 | 1945/ 2022 | श्री. भालचंद्र रामराव साळुंके, रा. लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कार्यालय लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 29 | 75/2022 | श्री.विनोद गोपीनाथ कोरके, रा. काश्मीर नगर गल्ली नं. 04, कांचनवाडी पैठण रोड छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालय जाधववाडी छत्रपती संभाजीनगर ND | सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती कार्यालय जाधववाडी छत्रपती संभाजीनगर | |
| 30 | 76/2022 | श्री.विनोद गोपीनाथ कोरके, रा. काश्मीर नगर गल्ली नं. 04, कांचनवाडी पैठण रोड छत्रपती संभाजीनगर | अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महावितरण कार्यालय जुने पावर हॉऊस परिसर मिल कॉर्नर छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महावितरण कार्यालय जुने पावर हॉऊस परिसर मिल कॉर्नर छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.04.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 81/2022 | श्री.विनोद गोपीनाथ कोरके, रा. काश्मीर नगर गल्ली नं. 04, कांचनवाडी पैठण रोड छत्रपती संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी मृद व जलसंधारण (म.रा), वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर | उपायुक्त (प्रशासन), मृद व जलसंधारण (म.रा), वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर | |
| 32 | 82/2022 | श्री.विनोद गोपीनाथ कोरके, रा. काश्मीर नगर गल्ली नं. 04, कांचनवाडी पैठण रोड छत्रपती संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी मृद व जलसंधारण (म.रा), वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर | उपायुक्त (प्रशासन), मृद व जलसंधारण (म.रा), वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर | |
| 33 | 83/2022 | श्री.विनोद गोपीनाथ कोरके, रा. काश्मीर नगर गल्ली नं. 04, कांचनवाडी पैठण रोड छत्रपती संभाजीनगर | प्रशासकीय अधिकारी मृद व जलसंधारण (म.रा), वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर | उपायुक्त (प्रशासन), मृद व जलसंधारण (म.रा), वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर | |
| 34 | 1480/2022 | श्री. गोरख वामन पवार, रा. सिडको एन-2, प्लॉट नं. 29, सर्वे नं. 12, श्रध्दा कॉलनीच्या बाजुला, धत हॉस्पीटल जवळ, तोरणागडनगर, छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं. 1 छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं. 1 छत्रपती संभाजीनगर | |
| 35 | 2797/2022 | श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, रा. गल्ली नं. 5, अंबादास पांडे चा वाडा, उत्तम नगर, जवाहर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | |
| 36 | 2798/2022 | श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, रा. गल्ली नं. 5, अंबादास पांडे चा वाडा, उत्तम नगर, जवाहर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | |
| 37 | 2799/2022 | श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, रा. गल्ली नं. 5, अंबादास पांडे चा वाडा, उत्तम नगर, जवाहर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | |
| 38 | 2800/2022 | श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, रा. गल्ली नं. 5, अंबादास पांडे चा वाडा, उत्तम नगर, जवाहर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | |
| 39 | 2801/2022 | श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, रा. गल्ली नं. 5, अंबादास पांडे चा वाडा, उत्तम नगर, जवाहर कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्रं.-1, सिंचन भवन परिसर जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | |
| 40 | 2952/2022 | श्री. सचिन सुभाषसिंग महाजन, मु.पो. नागद ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर लघु पाटबंधारे विभाग जालना रोड छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर लघु पाटबंधारे विभाग जालना रोड छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

| | | सुनावणीचा दि.04.04.2024 | | वेळ दुपारी 3.00 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 3041/ 2022 | श्री. लक्ष्मण कचरु तायडे, मु.पो. हळदा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 42 | 2468/ 2022 | श्री. पांडुरंग विनायकराव लबडे, मु.पो. मुधलवाडी ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर | उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक कार्यालय, प्लॉट नं. अे-4/1, पर्यावरण भवन लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक कार्यालय, प्लॉट नं. अे-4/1, पर्यावरण भवन लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र जालना रोड, छत्रपती संभाजीनगर | |
| 43 | 2486/ 2022 | अॅड. पंडित आर. जाधव, रा. प्लॉट नं. 32, गजानन कॉलनी, श्रीनिवास मल्टिसर्व्हिसेस, गारखेडा छत्रपती संभाजीनगर | महाव्यवस्थापक (DMIC), ऑरीक हॉल इमारत शेंद्रा ऑरिक सिटी पर्कीस कंपनीसमोर, शेंद्रा MIDC, छत्रपती संभाजीनगर | महाव्यवस्थापक (DMIC), ऑरीक हॉल इमारत शेंद्रा ऑरिक सिटी पर्कीस कंपनीसमोर, शेंद्रा MIDC, छत्रपती संभाजीनगर | |
| 44 | 2556/ 2022 | श्री.बाबासाहेब राधाकिसन धुमाळ, रा. चंद्रपाल नगर स्टेशन रोड वैजापुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | सहायक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग छत्रपती संभाजीनगर | जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग छत्रपती संभाजीनगर | |
| 45 | 2300/ 2022 | श्री. रवि देवराव बनकर, रा. संसार नगर, क्रांती चौक पोलीस स्टेशन, जवळ छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग छत्रपती संभाजीनगर | |
| 46 | 2301/ 2022 | श्री. रवि देवराव बनकर, रा. संसार नगर, क्रांती चौक पोलीस स्टेशन, जवळ छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग छत्रपती संभाजीनगर | |
| 47 | 1482/ 2022 | श्री. तनय मनोज काला, रा. चेलीपुरा काचीवाडा, काश्मीर निवास, छत्रपती संभाजीनगर | व्यावस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर | महाव्यावस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर | |
| 48 | 2043/ 2022 | श्री. अहमद खान करीम खान, पाण्याच्या टाकी जवळ, विद्यपीठ गट जवळ कुतुबपुरा, छत्रपती संभाजीनगर | वाइस चांसलर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यपीठ, छत्रपती संभाजीनगर | कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यपीठ, छत्रपती संभाजीनगर | |
| 49 | 2232/ 2022 | श्री. नितीन अशोक गिरी, मु.पो. शिवुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | सचिव, कृषि उत्पन बाजार समिती वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर ND | उपनिबंधक सहकारी संस्था, वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर | |
| 50 | 2872/ 2022 | श्री. बाबुलाल देवचंद झरवाल, रा. अजिंठा ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | मुख्याध्याधिकारी, नगर परिषद सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | गुगल मिटींग कोड-phb-bfpb-ufe | |

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५४/२०२२, ५५/२०२२ व ५९/२०२२-०३**
**बोर्ड क्र.०१ ते ०३**

श्री. सोमनाथ येडू मनाळ, — अपिलार्थी
रा. शिवाजी महाले चौक योगेश्वरी शाळेजवळ, गट नंबर ८६ प्लॉट नंबर ६५, वडगाव (को), ता.जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),
परिक्षेत्र वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपवनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),
उपवनसंरक्षक कार्यालय, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | ५४/२०२२ | १३.०९.२०२१ | दि.०१.०५.२०१७ ते माहिती मिळेपर्यंत या कालावधीतील आपल्या कार्यालयाच्या आखत्यारित्यातील असलेल्या वैजापूर येथील एकूण कर्मचारी व अधिकारी यांची यादी देवून कार्यालयात कर्तव्यावर विलंबने आलेले अधिकारी कर्मचारी यांच्यावर विलंबाने आल्याबद्दल झालेल्या कारवाईचा अहवाल देवून विलंब रजिस्टरच्या छायांकित प्रती देण्यात याव्यात. |
| ०२ | ५५/२०२२ | १३.०९.२०२१ | दि.०१.०१.२०१५ ते माहिती मिळेपर्यंत आपल्या कार्यालयाच्या आखत्यारित्यात काम करणारे वनकर्मचारी (अधिकारी) राऊत मॅडम व तरके सर यांनी कर्तव्यावर असतांनी घेतलेल्या एकूण रजा व त्यासाठी वरिष्ठांनी दिलेली परवानगी यांच्या प्रमाणीत प्रती देण्यात याव्या. |
| ०३ | ५९/२०२२ | १३.०९.२०२१ | दि.०१.०१.२०१५ ते माहिती मिळेपर्यंत आपल्या कार्यालयाच्या आखत्यारित्यातील वैजापूर येथील वन कर्मचारी वन अधिकारी यांच्या विरुध्द आलेल्या तक्रारी यांच्या झेरॉक्स कॉप्या देवून त्यावर झालेल्या करवाईचा दैनंदिन प्रगती अहवाल देण्यात यावा. |

सदर तीन्ही माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दि.२७.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागद पत्रांवरुन दिसून येत आहे. अपिलार्थी यांचे एकूण तीन दि.०८.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या

अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी ऑनलाईन सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जासंदर्भातील केलेल्या कार्यवाहीची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही. तसेच माहिती अपुर्ण व दिशाभूल करणारी मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),परिक्षेत्र वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील, कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. उपवनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),उपवनसंरक्षक कार्यालय, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग प्रदेश, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

१. उपरोक्त निर्देशासह तीन द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ-५५,५५ व ५९/२०२३-३/एसएस/ 8217 दिनांक :- 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, वनविभाग प्रदेश, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०६२/२०२२
बोर्ड क्र.०४

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, — अपिलार्थी
एन-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००५

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) परिक्षेत्र खुलताबाद
जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) उपवनसंरक्षक कार्यालय,
उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २०.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.१५ ऑगस्ट २०२१ ते दि.२० ऑगस्ट २०२१ या कालावधीतील आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात १५ ऑगस्ट २०२१ रोजी मृत पावलेल्या मोर, लांडोर पक्षी ताब्यात घेतेवेळी उपस्थित कर्मचारी, अधिकारी, उपस्थित सर्वपंचाची स्वाक्षरी असलेला केलेला पंचनामा, अहवाल, याप्रमाणे मृत पक्षांना पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सपुर्द केलेले पत्र, यानुसार प्राप्त वैद्यकीय तपासणी अहवाल, तदनंतर सदर मृत पक्षांची लावलेली विल्हेवाट/अंतिम विधी व याबाबत केलेला अहवालाची छायांकित प्रत व उपलब्धतेनुसार फोटो माहिती अधिकार अधिनियम-२००५ नुसार माहिती अधिकारी यांचा शिक्का, स्वाक्षरीसह दिनांक व पान क्रमांक नमूद करुन माहिती द्यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.११.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी ऑनलाईन सुनावणीच्यावेळी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती दिली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) परिक्षेत्र खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) परिक्षेत्र खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) उपवनसंरक्षक कार्यालय, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग प्रदेश, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग प्रदेश, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.०६२/२०२२/एसएस/ 8218 दिनांक : 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, वनविभाग प्रदेश, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०८९९/२०२२
बोर्ड क्र.०५

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, — अपिलार्थी
एन-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००५

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) वन विभाग सिल्लोड,
जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (प्रा.) उपवनसंरक्षक कार्यालय,सिल्लोड,
जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाइन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी अपिलार्थी यांनी ऑनलाईन सुनावणी दरम्यान अवगत केले की, प्रस्तुत प्रकरणात माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली असून प्राप्त झालेल्या माहितीबाबत आता कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.८९९/२०२२/एसएस/ 8219 दिनांक : 9/5/24

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०१७४/२०२२
बोर्ड क्र.०६

श्री. शेख हुसैन बुऱ्हान शेख,
मु. पो. पळशी (शहर),
ता.जि. छत्रपती संभाजीनगर
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी (नियोजन),
छत्रपती संभाजीनगर वनसंरक्षक (प्रा.), छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १४.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| | |
|---|---|
| १. | आपणास मौजे बकापूर शामवाडी येथील वन जमीनीवर केलेल्या अतिक्रमण विरुध्द दिलेल्या तक्रार अर्जानुसार संबंधितावर कार्यवाही करण्यात यावी. |
| २. | बकापूर येथे वनविभागाच्या जमीनीवर दोन अतिक्रमण करुन केलेले डांबरी व कच्चा रस्ता करण्याचे प्रयोजन व त्यास शासनाची मंजूरी असल्यास मंजरी आदेशाची प्रत देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०२.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.२५.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी ऑनलाईन सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, वेळेत माहिती न दिल्यामुळे असे कारण नमूद केलेले आहे, तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उचित कार्यवाही केलेली असल्यामुळे द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.०१७४/२०२२/एसएस/- 8220 दिनांक :- 9/5/24

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०२२४/२०२२
बोर्ड क्र.०७

श्री. सत्संगराज भिवराज सोनवणे, — अपिलार्थी
रा. नूर कॉलनी, हेड पोस्ट ऑफिसमोर, नारळीबाग,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कार्यालयी अधिक्षक, उपवनसंरक्षक (प्रा.),
छत्रपती संभाजीनगर वनविभाग, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक (प्रा.),
छत्रपती संभाजीनगर वनविभाग, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| खालील कार्यारंभ आदेशा संबंधातील सर्व कागदपत्रांची जसे ऑनलाईन निविदा (ID) अटी शर्ती, ठेकेदार रजि. टेंडर प्रसिध्दी कार्यालयीन टिपणी, ठेकेदार कंपेरेटिव्ह, वर्क शेडयूल (कामाचे स्वरुप) ३० कामांचे कागदपत्राची माहिती अधिकारी कायदा २००५ सेक्शन २ (जे) १,२,३ अनुसार निरिक्षण करणे व नंतर हव्या असलेल्या झेरॉक्सप्रती साक्षांकित करुन घेणेबाबत मला तारीख व वेळ देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दि.१३.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, प्रतिसाद दिला असून, मागणी केलेल्या माहिती पैकी १० पृष्ठाची माहिती दिली असून, उर्वरीत माहिती संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्यात यावी असे अपिलार्थीस कळविल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

अपिलार्थी यांच्या दि.२०.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थीस माहिती पोस्टाने पाठविलेली आहे व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. यास्तव अपिलार्थीस पुनश्च: एकदा माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयी अधिक्षक, उपवनसंरक्षक (प्रा.), छत्रपती संभाजीनगर वनविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, पुनश्च: एकदा आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास. किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक (प्रा.),छत्रपती संभाजीनगर वनविभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ-०२२४/२०२२/एसएस/ 8221 दिनांक : 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर.

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ०८९४/२०२२
बोर्ड क्र.०८

श्री. राजेंद्र बाबुराव राऊत, — अपिलार्थी
द्वारा- सी ९/५, भारत नगर एन-१३,
हडको छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
कार्यालयीन अधिक्षक, उप वनसंरक्षक (प्रा.),
छत्रपती संभाजीनगर वनविभाग यांचे कार्यालय, वनभवन
एस.एस.सी.बोर्डासमोरे, रेल्वेस्टेशन रोड उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक,
वन विभाग, छत्रपती संभाजीनगर, वनभवन, एस.एस.सी.बोर्डा समोर,
रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०६.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| आपल्या कार्यालयामार्फत आरामशिनची परवानगी देण्यात आली. यामध्ये तालुका भोकरदन व जाफ्राबाद जिल्हा जालना येथील आरामशिन नाव निहाय, गाव निहाय, दस्ताऐवज निहाय. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत दि.२०.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, दोन पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

अपिलार्थी यांच्या दि.०७.०९.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी ऑनलाईन सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थीस माहिती पाठविलेली आहे तसेच प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, परवानगी, दस्ताऐवज निहाय न मिळाल्यामळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या जोडपत्र क मधील प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे. यास्तव अपिलार्थीस पुनश्च: एकदा संपूर्ण माहिती देण्यात यावी, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, उपवनसंरक्षक (प्रा.), यांचे कार्यालय, छत्रपती संभाजीनगर वनविभाग, वनभवन एस.एस.सी.बोर्डासमारे, रेल्वेस्टेशन रोड उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक, वन विभाग, छत्रपती संभाजीनगर, वनभवन, एस.एस.सी.बोर्डा समोर, रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि्द.अ.०८९४/२०२२/एसएस/ 8222 दिनांक :- 3/5/24
प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८०४/२०२२**
**बोर्ड क्र.०९**

श्री. साहेबराव श्रीरंग हजारे,
रा.प्लॉट नं.१२,
संगिता कॉलनी बास्केट बॉल ग्राउंडच्या शेजारी,
भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपवनसंरक्षक (प्रा.), वनीकरण छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (प्रा.), वनीकरण छत्रपती संभाजीनगर : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०४.१२.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सप्टेंबर २०१६ ते जानेवारी २०१८ या कालावधीतील मनोज कापूरे तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी वैजापूर यांनी त्यांच्या कार्यालयात वैजापूर वनपरिक्षेत्रातील राखीव वनातील अतिक्रमण काढल्याबाबत आपल्या कार्यालयास सादर केलेल्या सर्व अहवालाच्या प्रती... |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०८.०१.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम, विस्तृत स्वरुपाची व मोठया कालावधीची माहिती मागितल्याचे दिसून येते. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक (प्रा.), वनीकरण छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी

माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक (प्रा.), वनीकरण छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक (प्रा.), वनीकरण छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१८०४/२०२२/एसएस/ 8223 दिनांक : 9/5/24
प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०८७/२०२२
बोर्ड क्र.१०

श्री. अंबादास राजाराम तळणकर, — अपिलार्थी
रा. एन-११,सी-४,१/२, गजानननगर, हडको,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.)
परिक्षेत्र वन भवन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (वनीकरण),
सहायक वनसंरक्षक कार्यालय,
वनभवन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २७.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जुले २०२१ ते ऑक्टोबर २०२१ या कालावधीतील आपल्या कार्यालयातील रोकडवही (Cash book) ची माहिती छायांकित प्रमाणीत प्रतीत द्यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१५.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहितीकरिता अवलोकन दिल्याचे दि.०७.१२.२०२१ रोजीच्या प्रथम अपील आदेशात नमूद केलेले आहे.

अपिलार्थी यांच्या दि.०१.१२.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०७.१२.२०२१ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही. ते वारंवार असेच काहीतरी कारण सांगतात ते कार्यालयात उपस्थित राहत नाहीत, मी पैसे भरण्यास तयार आहे. त्यावर जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करुन माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले होते तसेच प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) परिक्षेत्र वन भवन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत

टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक (वनीकरण), सहायक वनसंरक्षक कार्यालय, वनभवन उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.-१०८७/२०२२/एसएस/ 8224 दिनांक :- 9/5/24

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१५९/२०२२**
**बोर्ड क्र.११**

श्री. शिंदे महेंद्र सुखदेव,
रा. जयभीमनगर, टाऊन हॉल,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),
परिक्षेत्र खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक (प्रा.), उपवनसंरक्षक कार्यालय, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १८.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.१५ ऑगस्ट २०२१ रोजी आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात मौजे धामणगांव शिवारात आपल्या कार्यालयातील वनमजूराने पकडलेले मोर व लांडोर हे जीवंत असतानी आपल्या कार्यालयाने सदर मोर व लांडोर या पक्षाचे जे काही त्यांची वस्तुस्थिती आहे किंवा त्यांचा आजचा अहवाल, वनमजुराने पकडलेले फोटो, ते कोणत्या परिस्थतीत आहे, त्यांच्या देखभालीचा अहवाल, त्यांना जे खाद्य पुरविले जात आहे. त्याचा खाद्य अहवाल, जर आपण सदर पक्षी जंगलात सोडले असेल त्याचा अहवाल, उपस्थित कर्मचाऱ्यांची नावे, पुढेत्या बाबतची सविस्तर माहिती छायांकित प्रतीत देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०१.१२.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),परिक्षेत्र खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील

तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.),परिक्षेत्र खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपवनसंरक्षक (प्रा.), उपवनसंरक्षक कार्यालय, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२३२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२१५१/२०२२/एसएस/ 8225 दिनांक:- 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१६१/२०२२ व २१६२/२०२२-०२**
**बोर्ड क्र.१२ व १३**

अॅड. रमेशचंद उ जाजु,
रा. आर. एच-२०, ऑरेंज सिटी, पैठण रोड,
छत्रपती संभाजीनगर

अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा,
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), परिक्षेत्र वैजापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर

उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो व कॅम्पा),
सहायक वनसंरक्षक कार्यालय,
नगर परिषद, ईमारतीच्या शेजारी कन्नड,
ता. कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

: उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट अॅपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहितीचा अर्जाचा दिनांक | माहितीचा विषय/ तपशिल |
|---|---|---|---|
| १२ | २१६१/२०२२ | ०२.०७.२०२१ | सन०१ जानेवारी २००० ते ०१ जुलै २०२१ पर्यंत १. आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये एकूण सॉ मिल किती आहे त्यांची नावे व पत्यासहीत याबाबत लेखी महिती मिळणेबाबत.<br>२. आजपावेतो किती सॉ मिल चे परवाना रद्द केले आहे याची लेखी माहिती देण्यात यावी.<br>३. आजपर्यंत किती सॉ मिलवर दंडात्मक कारवाई केली आहे याची लेखी माहिती देण्यात यावी.<br>४. आजपावेतो विना परवानगीने तोडलेले झाडे टींबर कटींग सॉ मिल वर आलेली आपन झाडे जप्त केली व नाही याची लेखी माहिती देण्यात यावी.<br>५. विना परवानगी तोडलेले झाड सॉ मिलवर कटींगसाठी आले असता सॉ मिल वाल्याने ते झाड कटींग करुन दिल्यास त्यास आपण कोणत्या कायद्याने त्यावर कारवाई केली जाते यावर लेखी माहिती देण्यात यावी.<br>६. नविन सॉ मिल उभारणीसाठी कोणकोणती कागदपत्रे लागतात तसेच परवानाचा किती शुल्क भरावा लागतो याबाबत सविस्तरलेखी माहिती देण्यात यावी.<br>७. कायद्यामध्ये प्रत्येक पाच वर्षांनी शिर गिनती करण्याचा नियम आहे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | किंवा नाही याबाबत लेखी सविस्तर माहिती देण्यात यावी.<br>८. महाराष्ट्र संरक्षक वृक्ष संवर्धन कायदा १९७५ मध्ये घुटी अँड ट्री ऑथोरीटी यामध्ये तुमच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येकी ५ वर्षाच्या शिर गिनतीमध्ये किती झाडे आहेत याबाबत तपशील लेखी देण्यात यावा जर गिनती झालेली नसेल तर त्याची कारणासहीत लेली माहिती देण्यात यावी.<br>९. विना परवानगी झाड तोडलेले असल्यास त्याची विल्हेवाट कशी केली जाते याची लेखी माहिती देण्यात यावी.<br>१०. आपल्या कार्यक्षेत्रात आजपर्यंत किती बिबटे आढळले आहे याची माहिती देण्यात यावी.<br>११. आपल्या कार्यालयामध्ये वनविभागा संबंधी कोणते कायद्यांची अंमलबजावणी केली जाते याची लेखी माहिती देण्यात यावी. |
| १३ | २१६२/२०२२ | ०८.०६.२०२१ | सन २०१८ ते ०८.०६२०२१ पर्यंत, १. दि.१२.०५.२०२१ रोजी तक्रारदार नामे अँड आर यु जाजु यांनी दिलेल्यात क्रार अर्जावर कोणती कारवाई केली त्याबबात लेखी माहिती मिळणेबाबत एकूण १२ मुद्याद्वारे माहिती मागितलेली आहे. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि०८.०७.२०२१ व ०६.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती उपलब्ध करुन दिल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.१५.०७.२०२१ व ०३.०८.२०२१रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.०८.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, अर्जदारास अवलोकनाची संधी देवून १५ दिवसाच्या आत निशुल्क माहिती पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या व्दितीय अपिल प्रजयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

दोन द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ२१६१ व ६१२२/२०२२-२/एसएस/ 8226 दिनांक : 9/5/24

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२७१/२०२२
बोर्ड क्र.१४

श्री. शेख मिनहाज हाजी कादर, — अपिलार्थी
मु. पो. चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर-४१४ ६०६

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, सिल्लोड,
ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक,
सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला
चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२०-२०२१ ते आजपर्यंत आपले संपूर्ण कार्यक्षेत्रात झालेले विविध योजनाअंतर्गत वृक्षलागवड कामांची आपण आपले वरीष्ठ कार्यालय सादर केलेले नमुना नं.३५ (फार्म) प्रमाणकांची शासकिय सर्व झेरॉक्स प्रती देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.११.०९.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी ऑनलाईन सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिलेले आहे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी

मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, सिल्लोड, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक,सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, एस.एस.सी. बोर्डा समोर, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, एस.एस.सी. बोर्डा समोर, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२७१/२०२२/एसएस/ 822 दिनांक:- 9/5/24
प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, एस.एस.सी. बोर्डा समोर, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२७२/२०२२
बोर्ड क्र.१५

श्री. शेख मिनहाज हाजी कादर, अपिलार्थी
मु. पो. चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर-४१४६०६

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
वनक्षेत्रपाल,
सामाजिक वनिकरण परिक्षेत्र ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक,
सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला
चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२०-२०२१ ते आजतागायत या कालावधीतील आपले संपूर्ण कार्यक्षेत्रात राबविण्यात आलेल्या विविध योजनांची यादी (लिस्ट)त्यामध्ये योजना व कामांचे नाव ठिकाण अंतर रोपांची संख्या व त्यांचेसाठी आलेला शासकीय अनुदान (निधी) व त्यांचा आजपर्यंत झालेला खर्च या सर्वांची तपशीलवार सर्व झेरॉक्स प्रती देणे. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.११.०९.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी ऑनलाईन सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विस्तृत स्वरुपाची माहिती असल्यामुळे माहितीचे अवलोकन करुन माहिती घेऊन जाण्याबाबत संधी दिली होती. त्यावर अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती दिलेली नाही तसेच प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नकार दिला, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, एस.एस.सी. बोर्डा समोर, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२७२/२०२२/एसएस/8228 दिनांक : 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, एस.एस.सी. बोर्डा समोर, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२७३/२०२२
बोर्ड क्र.१६

श्री. शेख मिनहाज हाजी कादर, — अपिलार्थी
मु. पो. चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर-४१४६०६

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनक्षेत्रपाल,
सामाजिक वनिकरण परिक्षेत्र वैजापूर,
ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक,
सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला
चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०६.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१९-२०२१ ते आजतागायत या कालावधीतील आपले संपूर्ण कार्यक्षेत्रात राबविण्यात आलेले वृक्ष लागवडाचे सर्व काम करणारे मजूरांना अदा केलेले पगार (बिले) देयके चे आपण आपले वरीष्ठ कार्यालयाकडे सादर केलेले नमुना न.३५ (फार्म) प्रमाणकांची छायांकित सर्व झेरॉक्स प्रती देणे. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०७.०९.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२१.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीस १५ दिवसात माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशीत केल्याचे दिसून येते..

आज रोजी ऑनलाईन सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्याचे आदेशित केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मला माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र वैजापूर, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र वैजापूर, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२७३/२०२२/एसएस/ 8229 दिनांक : 9/5/24

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२७४/२०२२
बोर्ड क्र.१७

श्री. शेख मिनहाज हाजी कादर, — अपिलार्थी
मु. पो. चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर-४१४६०६

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनक्षेत्रपाल,
सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कन्नड,
ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक,
सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला
चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०५.०७.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१९-२०२१ ते आजतागायत या कालावधीतील आपले संपूर्ण कार्यक्षेत्रात विविध योजनांतर्गत झालेले वृक्षलावडाचे सर्व कामावर आजपर्यंत झालेले खर्चाची कॅश बुकांची साक्षांकित सर्व झेरॉक्स देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०९.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी ऑनलाईन सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती दिली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती अर्ज व प्रथम अपिल अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत. त्यांनी कलम ७(१) व १९(६) चा भंग झालेला आहे.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मला माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपिलाच्या प्रयोनजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कन्नड, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र कन्नड, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२७४/२०२२/एसएस/ 8230 दिनांक : 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२७५/२०२२ व २२७६/२०२२-(०२)
बोर्ड क्र.१८ व १९

श्री. शेख मिनहाज हाजी कादर, — अपिलार्थी
मु. पो. चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर-४१४ ६०६

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनक्षेत्रपाल,
सामाजिक वनिकरण परिक्षेत्र खुलताबाद,
ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक,
सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला
चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विवेचन |
|---|---|---|---|
| १८ | २२७५/२०२२ | ०५.०७.२०२१ | सन २०१९-२०२१ ते आजतागायत आपले संपूर्ण कार्यक्षेत्रातील सर्व रोपवाटीका (नर्सरी)मध्ये विविध रोपे तयार करणेसाठी खरेदी केलेली माती रेती (वाळू), खते, बी बियाणे व प्लॅस्टीक पिशवी यांची रक्कम किंमत व त्याचे पुरवठादार मालकांचे नाव पत्ता व त्यांना अदा केलेले देयके (बिल) या सर्वांची सर्व झेरॉक्स प्रमाणित प्रती. |
| १९ | २२७६/२०२२ | ०५.०७.२०२१ | सन २०२०-२०२१ ते आजतागायत आपले संपूर्ण कार्यक्षेत्रात राबविण्यात आलेल्या विविध शा. योजनांची यादी (लिस्ट) त्यामध्ये योजना व कामाचे नाव ठिकाण कामाचे स्वरुप व कामाची सध्यस्थिती व त्यासाठी आलेला शा. अनुदान (निधी) व त्यांची आजपर्यंत झालेला खर्च या सर्वांची सर्व झेरॉक्स प्रती देणे. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०९.०८.२०२१ रोजीच्या दोन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती

अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज प्राप्त झालेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या द्वितीय अपील प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र खुलताबाद, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, सामाजिक वनिकरण परिक्षेत्र खुलताबाद, ता. खुलताबाद, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक वनसंरक्षक, सामाजिक वनिकरण विभाग नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह दोन द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.--/२०२१/एसएस/ 8231 दिनांक :- 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२७७/२०२२**
**बोर्ड क्र.२०**

श्री. शेख मिनहाज हाजी कादर, — अपिलार्थी
मु. पो. चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर-४१४६०६

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
विभागीय वन अधिकारी (वन्यजीव),
नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विभागीय वन अधिकारी (वन्यजीव),
नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक २१.०९.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१९-२०२१ ते आजतागायत या कालावधीतील आपले संपूर्ण कार्यक्षेत्रात राबविण्यात विविध सर्व शा. योजनांची कामाची यादी (लिस्ट) त्यामध्ये योजना व कामाचे नाव, ठिकाण, गट नं. कामाचे स्वरुप व त्यांचेसाठी आलेला शा.अनुदान (निधी) व त्याचा आजपर्यंत झालेला खर्च या सर्वाची सर्व झेरॉक्स प्रती देणे. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१०.१०.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीस पाच पृष्ठांची माहिती दिलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही व निर्णय पारीत केले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते.

यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.
सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२७७/२०२२/एसएस/ 8232 दिनांक : 9/5/24
प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२७८ व २२७९/२०२२-२**
**बोर्ड क्र.२१ व २२**

श्री. शेख मिनहाज हाजी कादर, — अपिलार्थी
मु. पो. चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर-४१४६०६

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दोन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | द्वितीय अपील क्रमांक | माहिती अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| २१ | २२७८/२०२२ | १९.०६.२०२१ | सन २०२०-२०२१ मधील आपले संपूर्ण कार्यक्षेत्रात विविध योजना अंतर्गत झालेले सर्व वृक्षलागवडाचे कामांची यादी (लिस्ट) त्यामध्ये योजना व कामाचे नाव ठिकाण, अंतर, रोपाची एसंख्या व त्यांचे साठी आलेला शा. अनुदान (निधी) व त्यांचा आजपर्यंत कुशल व अकुशल कामावर झालेला खर्च या सर्वांची सर्व झेरॉक्स प्रती देणे. |
| २२ | २२७९/२०२२ | २१.०६.२०२१ | सन फेब्रुवारी २०२१ ते एप्रिल २०२१ मधील आपले संपूर्ण कार्यक्षेत्रातील सर्व वनक्षेत्रपाल (RFO) नी आपले कार्यालयास सादर केलेले व आपणाकडे उपलब्ध असलेले नमुना नं.३५ (फार्म) प्रमाणकांची साक्षांकित झेरॉक्स प्रती देणे. |

सदर दोन माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.२८.०७.२०२१ रोजीच्या दोन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही डिव्हीजनल ऑफिसला अर्ज करा असे कळविलेले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून संबंधित जन माहिती अधिकारी यांना पाच दिवसात वर्ग करणे अपेक्षित होते या ठिकाणी तसे केल्याचे दिसून येत नाही. यास्तव अपिलार्थीस माहिती संकलीत करुन देण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. विभागीय वन अधिकारी (वन्याजीव), नवीन प्रशासकीय इमारत १ ला मजला चुन्नीलाल पेट्रोल पंपाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह दोन अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२७८ व२२७९/२०२२-२/एसएस/ 8233 दिनांक :- 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
उप वनसंरक्षक, विभागीय वन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२८०/२०२२
बोर्ड क्र.२३

श्री.शेख मिनहाज हाजी कादर, — अपिलार्थी
मु. पो. चांदा, ता. नेवासा, जि. अहमदनगर-४११६०६

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वन परिक्षेत्र अधिकारी,
वन परिक्षेत्र कार्यालय, वन विभाग, रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहा. वनसंरक्षक (वनीकरण), उप वनसंरक्षक कार्यालय, वन भवन
तळ मजला, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०८.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१९-२०२० व २०२० ते आजतागायत आपले संपूर्ण कार्यक्षेत्रातील सर्व रोप वाटीका (नर्सरी), मध्ये विविध रोपे तयार करण्यासाठी खरेदी केलेले बि बियाणे खते, औषधे प्लॉस्टिक पिशवी माती वाळू (रेती) या सर्वाचे पुरवठादार एजन्सीला अदा केलेले देयके (बिल) या सर्वाची तपशीलवार संपूर्ण झेरॉक्स प्रती देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.११.०९.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, निर्णय पारित केला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, वन विभाग, रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध

असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, वन विभाग, रेल्वेस्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहा. वनसंरक्षक (वनीकरण), उप वनसंरक्षक कार्यालय, वन भवन तळ मजला, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२२८०/२०२३/एसएस/ 8234 दिनांक :- 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३००९/२०२२
बोर्ड क्र.२४

श्री. गोरख वामन पवार, — अपिलार्थी
रा. सर्वे नं.१२, श्रध्दा कॉलनीच्या बाजुला,
धुत हास्पीटल जवळ, तोरणागडनगर, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), परिक्षेत्र कार्यायल,
उस्मानपुरा रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक वनसंरक्षक (प्रा.),
कार्यालय उस्मानपुरा रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२०-२०२१ ते २०२१-२०२२ सदरील कालावधीत आपल्या वनपरिक्षेत्र कार्यालयात कार्यरत असलेले अधिकारी श्री. दादा बाबुराव तोर यांच्या कार्यकाळात एकूण कामाची कामनिहाय वर्क ऑर्डरची छायांकित प्रत मिळणेबाबत. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.११.०२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, कलम ७(९) नुसार कार्यालयात समक्ष हजर राहून माहितीचे अवलोकन करुन आवश्यक असलेली माहिती सशुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्यात यावी, असा प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.०८.०३.२०२२ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी ऑनलाईन सुनवणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीस दोनवेळेस माहितीचे अवलोकन करुन माहिती घेऊन जाण्याबाबत पत्र दिलेले आहे. तथापि अपिलार्थी कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे अवलोकन केलेले नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रयोजनामध्ये तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), परिक्षेत्र कार्यायल,उस्मानपुरा रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती

का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. सहायक वनसंरक्षक (प्रा.),कार्यालय उस्मानपुरा रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.३००९/२०२२/एसएस/ 8235 दिनांक : 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य वनसंरक्षक, वनविभाग, प्रदेश छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १४६८/२०२२
बोर्ड क्र.२५

श्री. विश्वास देविदासराव नवपुते, — अपिलार्थी
रा. चिकलठाणा सुतारवाडा, ता.जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहायक,
उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय,
गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०५.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मा. उप अधिक्षक भूमि अभिलेख साहेब गंगापूर मा. तहसिलदार गंगापूर डॉ. अरुण जऱ्हाड यांनी दि.०७.०८.२०१९ रोजी राजनगांव शे.पू गट क्र.५ १ हे ३३ R साठी अकृषिक परवानगी दिली आहे. सदर अकृषीक परवानगीची एक प्रत प्रतिलीपी म्हणून आपल्या कार्यालयास दिली आहे. तेंव्हा आपल्या कार्यालयाकडून सदर अ कृषीक परवानगीसाठी मा. तहसिलदार गंगापूर डॉ. अरुण जऱ्हाड यांनी दि.०७.०८.२०१९ रोजी अकृषिक परवानगी दिली आहे. त्याप्रमाणे उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, गंगापूर यांनी मागिल बाजूस मागितलेली माहिती देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१२.११.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती अर्जासंदर्भात व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य

उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.१४६८/२०२२/एसएस/ 8236 दिनांक :- 9/5/24

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २३५०/२०२२
बोर्ड क्र.२६

श्री. शेख मोईजोद्दिन अमीरोद्दिन, — अपिलार्थी
रा. गुलशन कॉलनी, एम.जी.एम. गोल्फ क्लब गेट समोर,
शीफा मेडिकल शेजारी छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक,
भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक,
भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

### (सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १७.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मौजे फतियाबाद ता. गंगापूर येथील सर्वे नं.२ हिइना जमीन गट नं.२ कशी झाली कोणत्यावर्षीसाठी याची माहिती मिळणे लेखी स्वरुपात आणि गट स्टेटमेंन्टची ८/३ ८/४ चा उतारा लेखी स्वरुपात मिळणेबाबत. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.०५.१२.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत

टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२३५०/२०२२/एसएस/-8501 दिनांक :- 12/5/24
प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २८६२/२०२२
बोर्ड क्र.२७

श्री.शोयब शामशोद्दिन शेख, — अपिलार्थी
रा. शम्स विला, प्लॉट क्र.९७, सेक्टर ए-१३, सिडको हिमायतबाग,
छत्रपती संभाजीनगर-४३१००२

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, कन्नड,
जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय,
कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी ऑनलाईन दिनांक ०७.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मौजे जैतापूर गट क्र.२२५ चे पक्काबुक, टिप्पन, असल शेतवार, शेतवार, गट स्टेटमेंट, प्रतिबुक, टोच नकाशा, इत्यादी साक्षांकित प्रत देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविलेली आहे व तसेच ईमेलला पण पाठविलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील

तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.२८६२/२०२२/एसएस/ 8237 दिनांक :- 9/5/24
प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९४५/२०२१२**
**बोर्ड क्र.२८**

श्री. भालचंद्र रामराव साळूंके, — अपिलार्थी
रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कार्यालय, लासूर स्टेशन,
ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
सहायक कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ३०.११.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२१ जून ते माहिती देईपर्यंत वरिष्ठ महावितरण कंपनी कार्यालयाकडून लासूर स्टेशन व अंतर्गत गावांना घरगुती मीटर प्राप्त झाल्याबाबत व ग्राहकांना मीटर बसविल्याबद्दलची एकूण चार मुद्यांबाबत माहिती साक्षांकित मागितलेली आहे. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.३१.१२.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यांच्या अनुस्थितीची नोंद घ्यावी व मला माहिती देवून संबंधितावर कार्यवाही करावी.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी कार्यालय, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात

उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी कार्यालय, लासूर स्टेशन, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहायक कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म., छत्रपती संभाजीनगर परिमंडल कार्यालय, विद्युत भवन जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर -४३१ ००१ यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.,छत्रपती संभाजीनगर परिमंडल कार्यालय, विद्युत भवन जुने पावर हाउस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर -४३१ ००१ यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.वि.अ.-१९४५/२०२२/एसएस/ 8238 दिनांक : 9/5/24
प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,
मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म.,छत्रपती संभाजीनगर परिमंडल कार्यालय, विद्युत भवन जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर -४३१ ००१

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७६/२०२२
बोर्ड क्र.३०

श्री. विनोद गोपीनाथ कोरके, — अपिलार्थी
रा. काश्मीर नगर गल्ली नं.०४,कांचनवाडी पैठण रोड,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य),
महावितरण कार्यालय जुने पावर हॉऊस परिसर मिल कॉर्नर छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (स्थापत्य), महावितरण कार्यालय जुने पावर हॉऊस परिसर मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक १९.०३.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| १. दि.०१.१२.२०१९ ते आजपर्यंत १. ज्या शासन निर्णयानुसार निविदा काढण्यात आल्या त्या निर्णयाची व नियमावलीची छायाकित प्रत. २. वरिल कालावधीत किती खुल्या निविदा काढण्यात आल्या त्या सर्व कार्यादेशच्या व त्यांनी गुत्तेदारांनी जमा केलेल्या (online) वर्क इन व वर्क इन हँड व त्यांच्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात याव्या ही विनंती. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०४.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, रु.१७,४८०/- इतक्या शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करावी असा प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांच्या दि.१०.०८.२०२१ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी संदर्भात दि.१२.१०.२०२१ नोटीस पाठविल्याचे दिसून येत आहे. तथापि सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मला पुरविण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य),महावितरण कार्यालय जुने पावर हॉऊस परिसर मिल कॉर्नर छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच

३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. मुख्य अभियंता, मराविविकंम. छत्रपती संभाजीनगर परिमंडल कार्यालय, विद्युत भवन जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर -४३१ ००१ यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

३. मुख्य अभियंता, मराविविकंम. छत्रपती संभाजीनगर परिमंडल कार्यालय, विद्युत भवन जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर -४३१ ००१ यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.७६/२०२२/एसएस/ 7688 दिनांक : 08/05/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

मुख्य अभियंता, मराविविकंम. छत्रपती संभाजीनगर परिमंडल कार्यालय, विद्युत भवन जुने पावर हाऊस कंपाऊंड मिल कॉर्नर, छत्रपती संभाजीनगर -४३१ ००१

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८१ ते ८३/२०२२-०३**
**बोर्ड क्र. ३१ ते ३३**

श्री. विनोद गोपीनाथ कोरके, ... अपिलार्थी
रा. काश्मीरनगर गल्ली नं.०४,
कांचनवाडी पैठणा रोड, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ... उत्तरवादी क्र.१
प्रशासकीय अधिकारी मृद व जलसंधारण (म. रा.),
वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा ... उत्तरवादी क्र.२
उपायुक्त (प्रशासन),
मृद व जलसंधारण (म.रा.), वाल्मी परिसर, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी तीन माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड अ.क्र. | व्दितीय अपील क्रमांक | माहितीचा अर्जाचा दिनांक | माहितीचा तपशिल/ विषय |
|---|---|---|---|
| ३१ | ८१/२०२२ | ०४.०९.२०२० | दि.०१ डिसेंबर २०१९ ते आजपर्यंत वरील कालावधीमध्ये आपल्या संस्थेमध्ये इलेक्ट्रीकल व सिव्हीलची किती बिलं देण्यात आली त्या सर्व बिलांच्या एम.बी. रेकॉर्ड पासींग सहीत पानांच्या छायांकित प्रती. |
| ३२ | ८२/२०२२ | ०९.१०.२०२० | दि.१०.०८.२०२० ते आजपर्यंत या कालावधीतील क्रमांक २०२०/प्र.क्र.३७/जल ९ मृद व जल संधारण विभाग, मंत्रालय, मुंबई या पत्रानुसार झालेल्या कार्यवाही अहवालाच्या छायांकित प्रती. |
| ३३ | ८३/२०२२ | ०४.०९.२०२० | दि.०१ डिसेंबर २०१९ ते आजपर्यंत वरील कलावधीतील कॅश बुक मधील सर्व इंटरी केलेल्या पानांच्या छायांकित प्रती. वरील कार्यकाळात इलेक्ट्रीकल व सिव्हीलच्या बिलाच्या सी सी च्या छायांकित प्रती देण्यात यावे ही विनंती. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.२७.१०.२०२०,१३.०७.२०२१ व दि.२१.१०.२०२० रोजीच्या तीन प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, मला कोणतीच माहिती दिलेली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मला माहिती पुरविण्यात आली नाही किंवा कुठलाही पत्रव्यवहार केला नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मोघम व विस्तृत स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. यास्तव अपिलार्थीस अवलोकन देवून माहिती उपलब्ध करुन देणे उचित होईल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी मृद व जलसंधारण (म. रा.), वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं. ०५.००) करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा ती उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का देता येत नाही) अपिलार्थी यांना कळविण्यात यावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी मृद व जलसंधारण (म. रा.), वाल्मी परिसर, कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपायुक्त (प्रशासन),मृद व जलसंधारण (म.रा.), वाल्मी परिसर, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

४. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

५. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दि.०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करावी.

६. उपरोक्त निर्देशासह तीन द्वितीयअपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.व्दि.अ.८१ ते ८३/२०२२-०३ /एसएस/7689 दिनांक :- 08/05/2024

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीकरिता,

प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १४८०/२०२२
बोर्ड क्र.३४

श्री. गोरख वामन पवार, — अपिलार्थी
रा. सिडको, एन-२, प्लॉट क्र.२९,
सर्वे नं.१२, श्रध्दा कॉलनीच्या बाजुला,
धुत हॉस्पीटल जवळ, तोरणागडनगर, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग क्र.०१, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे विभाग क्र.०१, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०४.०४.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी गुगल मीट ॲपव्दारे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढील कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१२.२०२१ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१या कालावधीतील आपल्या कार्यालयातील मा. कार्यकारी अभियंता श्री. धनंजय गोडसे, लघु पाटबंधारे यांच्या कार्यकाळात संपूर्ण योजने निहाय केलेल्या कामाची यादी, कामनिहाय संचिका त्यांनी केलेल्या जिल्हयातील, तालुक्यातील गावनिहाय केलेल्या दौऱ्याचा अहवाल, गाडी क्रमांक, गाडीचा दैनंदिन अहवाल, इंधन खर्चाचा तपशिल, बिलाच्या पावत्या, त्यांनी वाटप केलेले बिलाची / देयकांची छायांकित प्रत, आदी स्वरुपाची माहिती छायांकित प्रतीत देण्यात यावी. |

सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांच्याकडुन कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. अपिलार्थी यांच्या दि.१०.०१.२०२२ रोजीच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसून येत नाही. त्या अनुषंगाने त्यांचेकडुन कलम १९ (६) चा भंग झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती अर्ज व प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबतची कोणतीही अनुषंगिक कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही.

